# स्वभाषेचा त्याग म्हणजे सर्वांगीण अधःपात

नुकतेच पंतप्रधानांनी हिंदी ही देशाची संपर्कभाषा म्हणून विकसित करण्याची जरुर आहे असे सांगितले. याचा अर्थ असा होतो की, देशाची संपर्कभाषा होण्याची पात्रता अजून हिंदीमध्ये आली नाही. ती विकसित होण्याची आवश्यकता आहे.

हा विचार स्वराज्यानंतर उदयाला आलेला आहे. संविधानाने १५ वर्षात इंग्रजीचे उच्चाटन करून केन्द्रसरकारने फक्त हिंदीचाच वापर करावा असा आदेश दिला, तेव्हा हिंदी विकसित नाही असा विचार कोणाच्या मनात आला नव्हता. १५ वर्षे हिंदीच्या विकासासाठी संविधानाने दिली नसून ज्यांना हिंदी येत नाही त्यांनी ती शिकावी म्हणून दिलेला होता.

तसेच पाच वर्षाच्या आत शिक्षणाचे सर्व स्तरावरील माध्यम म्हणून फक्त मातृभाषांचा वापर व्हावा, अशी कोठारी आयोगाने शिफारस केली तेव्हा पाच वर्षाचा काल देशी भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून विकसित होण्यासाठी



डॉ. नी.र. वऱ्हाडपांडे

## विवेक

दिलेला नसून शिक्षकांनी 'स्वतःच्या मातृभाषेतून शिकविण्याइतके मातृभाषेचे ज्ञान संपादन करण्यासाठी दिलेला होता. पुष्कळशा लोकांना मातृभाषेचे शिक्षण मिळालेले नसते व ज्यांना प्राथमिक शाळेत असे शिक्षण मिळाले त्यांना पुढे शिक्षणात व कार्यालयात

**सिंगापूरची समृद्धी**

यामुळे सिंगापूरमध्ये बहुसंख्य लोकांना येणारी कोणतीही भाषा नाही. तेव्हा इंग्रजी सोडून चीनी भाषा ही राज्यभाषा करण्याचा आग्रह धरणे कठीण होते.

पण चीनी भाषा ही सिंगापूरची राजभाषा नसली तरी खुद्द चीनमध्ये राज्याच्या व शिक्षणाच्या सर्व स्तरावर तिचा उपयोग होत असल्यामुळे ती सर्व बाबतीत समृद्ध आहे व त्यामुळे सारे महत्त्वाचे व्यवहार परभाषेत केल्यामुळे "आमच्या भाषा नालायक आहेत म्हणजे आम्ही नालायक आहोत", असा संस्कार मनावर होतो तसा सिंगापुरातील चीनी बहुसंख्येवर झालेला नाही. दुसरे असे की, सिंगापूरमध्ये साक्षरतेचे प्रमाण ८७ टक्के आहे. म्हणजे तेथील ७६ टक्के चीनी लोकांचे बौद्धिक जीवन चीनी भाषेवर म्हणजे स्वभाषेवरच पुष्ट झालेले आहे. तेव्हा सरकारातून व शिक्षणातून स्वभाषेची हकालपट्टी केल्यामुळे होणारे दुष्परिणाम दिसण्यास सिंगापूरची परिस्थिती अनुकूल नाही.

सिंगापूरच्या समृद्धीचा विचार केला असता असे दिसून येईल की, सिंगापुरी जनतेच्या खास कर्तृत्वाचा भाग तिच्यात थोडा आहे. सिंगापूरच्या निर्यातीची किंमत ३९००० दशलक्ष डॉलरांची आहे तर आयातीची किंमत ४२५०० जगातून सतत येत जात असलेल्या जहाजांना व विमानांना पेट्रोलचा पुरवठा करणे हा सिंगापूरच्या उत्पन्नाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**शेवटून पहिला**

जहाजदुरुस्ती हा सिंगापूरला सेवेमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा एक मोठा भाग आहे. तसेच नाणेव्यवहार हाही आहे. सिंगापूर हे आंतरराष्ट्रीय बन्दर असल्यामुळे साऱ्या जगाचे चलन तेथे येते. त्या चलनांची अदलाबदल हा सिंगापूरचा एक मोठा धंदा आहे.

तात्पर्य, बहुसंख्य चीनी लोकांची भाषा, म्हणजे सिंगापूरच्या प्रमुख नागरिकांची भाषा, समृद्ध आहे व सिंगापूर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे बन्दर आहे, ही सिंगापूरच्या समृद्धीची कारणे आहेत. तेव्हा स्वभाषा वापरू न शकणारे देश मागासलेले असतात या सर्वसाधारण नियमाला सिंगापूर हा अपवाद म्हणून सांगता येण्यासारखा नाही.

या उलट भारताची काय स्थिती आहे? भारतीय भाषांपैकी भारताच्या बाहेर बोलली जाणारी भाषा फक्त तमिळ ही आहे. ती कुठेही सरकार व शिक्षण यांच्या व्यवहारात सर्वत्र वापरली जाणारी भाषा नाही. बाकीच्या भारतीय भाषा भारतापुरत्याच सीमित आहेत. 'स्वराज्या'पूर्वी देशी संस्थानात भारतीय भाषा राजभाषा म्हणून वापरल्या जात होत्या. पण 'स्वराज्या'-नंतर संस्थाने भारतात विलीन झाली व तेथेही इंग्रजी हीच राजभाषा झाली. इंग्रजांच्या काळी इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर मुख्यतः विद्यापीठस्तरावर होत असे. स्वराज्यानंतर पाळण्यापासून इंग्रजीचा मारा करण्याची फॅशन पडली. म्हणजे सर्व क्षेत्रातून देशी भाषांना हद्दपार करण्याचा योजनाबद्ध कार्यक्रम अमलात आणला गेला.

तिचा वापर करावा न लागल्यामुळे मातृभाषेचा वापर करण्याचा सराव नसतो. असा सराव होण्यासाठी पाच वर्षांचा काळ कल्पिलेला होता.

देशी भाषा राज्यकारभाराच्या व शिक्षणाच्या सर्व स्तरावरील भाषा होण्याइतक्या विकसितच नाहीत हा विचार उत्पन्न होण्यास आंग्लदासांचा देशी भाषा विरुद्धचा सतत प्रचार कारणीभूत आहे.

जगातील निरनिराळ्या भाषांच्या स्थितीबद्दल विचार केला तर असे आढळून येईल की देश परतंत्र झाल्याशिवाय कोणत्याही देशाला स्वतःची भाषा सोडून राज्यकारभार व शिक्षण या साठी परभाषेचा आश्रय करावा लागलेला नाही. नार्वे, स्वीडन सारख्या देशातील ३०/४० लाखांच्या भाषा. आफ्रिकेतील आफ्रिकानीझ भाषा, थायलॅण्ड, कोरिया इत्यादि आशिया-खण्डातील लहान देशांच्या भाषा व चीनसारख्या विशाल देशाची अत्यंत किचकट समजली जाणारी भाषा या सर्व राज्यकारभाराच्या व शिक्षणाच्या सर्व स्तरावर वापरल्या जातात. नगरपालिकेचा कारभार असो. न्यायदान व कायदा या भाषेच्या काटेकोरपणाची अपेक्षा करणाऱ्या क्षेत्रातले काम असो की अणुविज्ञान असो.

दशलक्ष डॉलरांची आहे. म्हणजे निर्यातीची किंमत आयाती पेक्षा ३५०० दशलक्ष डॉलरांनी कमी आहे. याचा अर्थ असा होतो की, सिंगापूरजवळ जगाला देण्यासारखे कमी आहे व सिंगापूरची समृद्धी जगाला देण्यासारख्या वस्तूंचे उत्पादन तो देश मोठ्या प्रमाणावर करू शकला म्हणून निर्माण झालेली नाही.

सिंगापूरच्या उत्पादनात औद्योगिक उत्पादनाचा भाग ३८ टक्के तर सेवांच्या उत्पादनाचा ६२ टक्के आहे. सेवा म्हणजे ज्या कामाने डोळ्यांना दिसणारी व विकता येण्यासारखी, अशी एखादी वस्तू निर्माण होत नाही, पण जे काम समाजाला आवश्यक आहे अशी कामे. उदाहरणार्थ वकिली, औषधोपचार वगैरे कामे. साधारणपणे सर्व नोकऱ्यांचा सेवा या शब्दात अंतर्भाव होतो. कारखान्यातील मजुरीने वस्तू निर्माण होतात, पण या निर्माणात भांडवल व यंत्रे यांचा सहभाग फार मोठा असतो. सेवा या शब्दाचा दुसरा अर्थ भांडवल गुंतवून नफा मिळविणे हे ज्या कामाचे स्वरूप नाही व ज्यात होणारे उत्पन्न मुख्यतः कामामुळेच होते असे काम. मजुराचे उत्पन्न त्याच्या कष्टामुळे होते, त्याने काही भांडवल गुंतविले असते म्हणून होते नाही. तेव्हा मजूर जरी कारखान्यांत

याचा अपेक्षित परिणाम म्हणजे सर्वांगीण अधःपात हा स्पष्टपणे दिसून येऊ लागला. देशाच्या प्रगतीचे निकष म्हणून दरडोई उत्पन्न, आयुर्मान व साक्षरता हे निकष सर्वमान्य आहेत. या तीन्ही निकषांचा एकत्र वापर करून संयुक्तराष्ट्रसंघटनेने जगातील देशांचे क्रमांक लावले आहेत. त्यात भारताचा क्रमांक १३५ वा आहे. एकूण १७३ देशांचे क्रमांक लावण्यात आले आहेत. भारताच्या खाली असलेल्या ३८ देशांची नावे पाहिली तर त्यापैकी फक्त नेपाळ व इथियोपिया या देशांची नावे मी ऐकली आहेत. बाकीच्या देशांची नावेही ऐकली नाहीत व ती वाचल्यावरही मला आठवत नाहीत. **एकूण इंग्रजीचा सर्वत्र वापर करून स्वतःला प्रगत मानणारा भारत हा जगातील सर्वात मागासलेला देश आहे.**

श्रीलंकेतून इंग्रजीचे राजभाषा म्हणून उच्चाटन करणारा कायदा झाला व इंग्रजी येत नाही म्हणून कोणाला नोकरी नाकारण्यात येऊ नये असेही धोरण आखण्यात आले. या श्रीलंकेचा सर्व क्षेत्रात भारताच्या वर नंबर आहे. पाकिस्तानमध्ये भारतापेक्षा इंग्रजीचे बंड कमी आहे. या पाकिस्तानचा नंबर